# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः21.05.2024** **वारःमंगळवार**

---

1.लोकसभा निवडणुकीसाठी राज्यातली मतदानाची प्रक्रिया पूर्ण; पाचव्या टप्प्यात १३ मतदारसंघात मिळून सरासरी 54 पूर्णांक 33 शतांश टक्के मतदान

2.राज्य शिक्षण मंडळाच्या बारावीच्या परीक्षेचा निकाल आज ऑनलाईन जाहीर होणार

3.इराणच्या राष्ट्राध्यक्षांचा हेलिकॉप्टर अपघातात मृत्यू; देशभरात आज एक दिवसाचा राजकीय दुखवटा

आणि

4.पुण्याचा सुकांत कदम हा दिव्यांग बॅडमिंटनपटू पॅरिस पॅरालिम्पिकसाठी पात्र

**<u>मतदान</u>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील मतदान काल पार पडलं. सहा राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशांत मिळून देशभरातील ४९ लोकसभा मतदार संघांमध्ये काल मतदान झालं. यात राज्यातील धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे, उत्तर मुंबई, उत्तर-पश्चिम मुंबई, उत्तर-पूर्व मुंबई, उत्तर-मध्य मुंबई, दक्षिण-मध्य मुंबई आणि दक्षिण मुंबई या १३ लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. काल झालेल्या मतदानाच्या टप्प्याबरोबरच राज्यातील लोकसभा निवडणुकीसाठीची मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

या टप्प्यात झालेल्या मतदानात, देशभरात एकंदर ६शे९५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, स्मृति इराणी, राहुल गांधी, ओमर अब्दुल्ला आणि चिराग पासवान यांच्यासह राज्यात, अरविन्द सावंत, पीयूष गोयल, अमोल कीर्तिकर, उज्ज्वल निकम, वर्षा गायकवाड, हेमंत गोडसे, श्रीकांत शिंदे, भारती पवार आदि प्रमुख उमेदवारांचं भवितव्य काल मतदान यंत्रांत बंद झालं.

राज्य मतदान टक्केवारी

राज्यातील लोकसभा निवडणुकीच्या काल झालेल्या पाचव्या टप्प्यातील एकंदर 13 मतदार संघात संध्याकाळी 6 वाजेपर्यंत अंदाजे सरासरी 54 पूर्णांक 33 शतांश टक्के मतदान झालं. राज्यातल्या 13 लोकसभा मतदार संघातील संघनिहाय टक्केवारी याप्रमाणे. धुळे- ५६ पूर्णांक ६१ टक्के, दिंडोरी- ६२ पूर्णांक ६६ टक्के, नाशिक – ५७ पूर्णांक १० टक्के, पालघर- ६१ पूर्णांक ६५ टक्के, भिवंडी ५६ पूर्णांक ४१ टक्के, कल्याण ४७ पूर्णांक ८ शतांश टक्के, ठाणे ४९ पूर्णांक ८१ टक्के, मुंबई उत्तर – ५५ पूर्णांक २१ टक्के, उत्तर मध्य मुंबईत – ५१ पूर्णांक ४२ टक्के, उत्तर पूर्व मुंबईत – ५३ पूर्णांक ७५ टक्के, उत्तर पश्चिम मुंबईत – ५३ पूर्णांक ६७ टक्के, दक्षिण मुंबईत – ४७ पूर्णांक ७० टक्के, दक्षिण मध्य मुंबईत – ५१ पूर्णांक ८८ टक्के मतदान झालं.

**मतदान-नेते,अभिनेते**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी काल राज्यात अनेक मान्यवरांनी मतदानाचा अधिकार बजावला.

राज्यपाल रमेश बैस यांनी मलबार हिल इथल्या राजभवन क्लब मतदान केंद्रावर सपत्नीक मतदानाचं कर्तव्य बजावलं.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात सहकुटुंब मतदानाचा अधिकार बजावला. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, यांनीही कुटुंबासमवेत मतदानाचा हक्क बजावला. हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतल्या अनेक कलाकारांनीही काल मतदान केलं.

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी काल मतदानाचं कर्तव्य बजावलं. तसंच पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, पोलिस आयुक्त विवेक फणसळकर यांनीही मतदान केलं.

अनेक नवमतदारांनीही काल मतदान केलं. पहिल्यांदाच मतदान करण्याचा आपला अनुभाव सांगत आहे मुंबईतील एक नवमतदार ...

**अनोखी मतदान केंद्रे**

जास्तीत जास्त मतदारांना आकर्षित करण्याच्या हेतूने, राज्य निवडणूक आयोगाने काल काही मतदान केंद्रं अनोख्या पद्धतीने सजवली होती. मुंबईतील वेसावे इथं 'कोळीवाडा' संकल्पनेवर मतदान केंद्र उभारण्यात आलं होतं. इथले अधिकारी आणि कर्मचारी देखील पारंपारिक कोळी वेशभूषेत होते.

धारावी इथल्या ट्रान्झिट कॅम्प शाळा संकुलात ३४ मतदान केंद्रं उभारली होती. मतदारांच्या सोयीसाठी या केंद्रांना वेगवेगळे रंग दिले होते आणि त्याच रंगाच्या मतदान चिठ्ठ्या मतदारांना दिल्या होत्या. याशिवाय प्रवेशद्वाराजवळ त्या त्या रंगांचे दिशादर्शक फलकही लावण्यात आले होते.

**बारावी निकाल**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं यावर्षी मार्चमध्ये घेतलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षांचे निकाल आज जाहीर होणार आहेत. मंडळाच्या mahahsscboard.in या संकेतस्थळावर दुपारी एक वाजता निकाल विद्यार्थ्यांना पाहता येईल. गुणपडताळणीसाठी आणि गुणपत्रिकेच्या छायाप्रतींसाठी उद्यापासून ५ जूनपर्यन्त मंडळाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करता येतील.

**राजकीय शोक**

इराणचे अध्यक्ष इब्राहिम रईसी आणि परराष्ट्र मंत्री होसेन अमीर-अब्दोल्लाहियान यांचा हेलिकॉप्टर अपघातात मृत्यू झाला आहे. त्यांच्या निधनाबद्दल भारताने आज एक दिवसाचा राजकीय दुखवटा जाहीर केला आहे. दरम्यान, इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खमेनी यांनी उपराष्ट्रपती मोहम्मद मोखबर यांची काळजीवाहू अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे.

**अपघात**

पुण्यात कल्याणीनगर इथं शनिवारी रात्री झालेल्या वाहन अपघात प्रकरणातील, आरोपी अल्पवयीन असल्याने त्याला जामीन मिळाला; मात्र पोलीस विभाग याविरोधात सत्र न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचं पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्पष्ट केलं. ते काल पत्रकारांशी बोलत होते.

पुण्यातील एका प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिकाच्या मुलाने मद्यधुंद अवस्थेत भरधाव गाडी चालवत दोघांना धडक दिली. या अपघातात दोघांचा मृत्यू झाला. मुलाचे वडील आणि मुलाला मद्य देणाऱ्या पब मालकावर गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचं आयुक्तांनी सांगितलं. या प्रकरणी कोणालाही वाचवण्यात येणार नाही. विना नंबरप्लेट गाडी देणाऱ्या वाहन वितरकावर देखील कारवाई केली जाईल, असं आयुक्तांनी सांगितलं.

**खरी पपेरण्या**

राज्यात यंदाच्या खरीप हंगामात १४७ लाख ७७ हजार हेक्टरवरील पेरण्यांचं नियोजन कृषी विभागाने केलं असून, त्यासाठी सुमारे १९ लाख २८ हजार क्विंटल बियाण्यांची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत, याहून आधिक म्हणजे २५ लाख क्विंटल बियाणं उपलब्ध आहे, अशी माहिती पुणे कृषी संचालक विकास पाटील यांनी काल दिली.

राज्यात सोयाबीन पिकानंतर कापूस पिकाखाली ४० लाख हेक्टर क्षेत्र असून त्यासाठी ९५ हजार क्विंटल बियाण्यांची गरज असून सध्या ९७ हजार क्विंटल बियाणं उपलब्ध आहे. कापूस बियाण्यांच्या विक्रीला १५ मे पासून सुरुवात झाली असल्याचं पाटील यांनी सांगितलं.

**सोलापूर-वन्यप्राणी-पाणी**

सोलापूर जिल्ह्यात तापमानाचा पारा वाढत असून पिण्याच्या पाण्याची टंचाई देखील जाणवत आहे. जिल्ह्यातील वन्य जीवांना पिण्याचं पाणी मिळावं यासाठी वन विभाग टँकरद्वारे पाणी पुरवठा करत आहे. जिल्ह्यात विविध ठिकाणी सुमारे २०० कृत्रिम पाणवठे तयार करण्यात आले आहेत. काही ठिकाणी शासनाच्या योजनेतून सौर उर्जेवर चालणाऱ्या पंपाची व्यवस्था करण्यात आलेली आहे अशी माहिती जिल्ह्याचे उप-वनसंरक्षण अधिकारी धैर्यशील पाटील यांनी दिली आहे.

**अहमदनगर**

अहमदनगर जिल्ह्यातल्या अकोले तालुक्यातील कौठवाडी गावात, अनेक वर्षांपासून परंपरागत भरणारी कठ्याची यात्रा मोठ्या उत्साहात काल पार पडली. श्री बिरोबादेवाची ही यात्रा, कठ्याची यात्रा म्हणून प्रसिद्ध आहे.

**वाशिम**

वाशिमकरांनी काल ‘शून्य सावली दिन’ अनुभवला. दुपारी ठीक बारा वाजता, सावली अगदी आपल्या पायाखालीच आल्याचा अनुभव अनेकांनी घेतला. सावलीचे शिक्षण अधिक सुलभ व्हावे आणि सावलीबद्दलचे अनेक गैरसमज दूर व्हावेत या उद्देशाने भारतीय खगोल मंडळाने 'झीरो शॅडो डे' नावाचे ॲप विकसित केले आहे.

**पॅराऑलम्पिक**

इंट्रॉ - ऑलम्पिकमध्ये सहभागी होणं हे प्रत्येक खेळाडूचं स्वप्न असतं आणि दिव्यांग व्यक्तींसाठी तर हे एक मोठं आव्हान असतं. पुण्यातल्या सुकांत कदम या दिव्यांग बॅडमिंटनपटूने हे आव्हान यशस्वीपणे पेललं असून, 28 ऑगस्ट ते 8 सप्टेंबर दरम्यान पॅरिसमध्ये होणाऱ्या पॅरालिम्पिक स्पर्धेसाठी तो पात्र ठरला आहे. याविषयी आकाशवाणीशी बोलताना सुकांतने आपल्या भावना व्यक्त केल्या....

**<u>ॲथलेटिक-</u>**

थायलंडमधील बँकॉक इथं सुरू असलेल्या आशियाई ॲथलेटिक रिले अजिंक्यपद स्पर्धेत, भारतीय मिश्र संघाने काल राष्ट्रीय विक्रम मोडत नवीन विक्रम प्रस्थापित केला, शिवाय ४ बाय ४०० मीटर रीले प्रकारात सुवर्णपदक पटकावलं. मुहम्मद अजमल, ज्योतिका श्री, अमोज जेकब आणि सुभा वेंकटेशन या चार भारतीय खेळाडूंनी ही कामगिरी केली.

**<u>बुलढाणा,सांगली,कोल्हापूर,सातारा,वाशिम-अवकाळीपाऊस</u>**

राज्याच्या अनेक जिल्ह्यांना काल जोरदार पावसानं झोडपून काढलं.

बुलडाणा आणि वाशिम जिल्ह्यात खामगावमध्ये धान्य बाजारातील धान्य भिजल्याने शेतकऱ्यांचं नुकसान झालं. त्याबरोबरच फळ पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातही काल मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे काही ठिकाणी झाडं पडली; तसंच घरांचं नुकसान झाल्याचं आमच्या प्रतिनिधीने कळवलं आहे. पुणे शहर आणि परिसरात अनेक ठिकाणी काल पावसाने हजेरी लावली.

**<u>हवामान</u>**

राज्यात येत्या २४ तासात तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांसह पावसाचा अंदाज आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातल्या काही जिल्ह्यांमध्ये सोसाट्याच्या वाऱ्यासह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल. आणि कोकणात उष्ण आणि दमट हवामान राहणार असल्याचं हवामान विभागाने म्हटलं आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.